**D.A.V. PUBLIC SCHOOL, THANE.**
**SESSION: 2022-2023**
**PERIODIC TEST – II (HALF YEARLY EXAMINATION )**
**SUBJECT: BASIC MARATHI**

**CLASS: VIII** **MAX. MARKS :20**
**DATE:28.09.22** **TIME:40 Mins**

---

**सूचना**

- **प्रश्नपत्रिकेत तीन विभाग आहेत.तिन्ही विभाग सोडविणे आवश्यक.**
- **विभाग अ = ०६ गुण. गद्यउतारा आणि निबंधलेखन**
- **विभाग ब = ०८ गुण. व्याकरण**
- **विभाग क = ०६ गुण. पाठावर आधारित प्रश्नोत्तरे.**

## विभाग : अ

**प्रश्न १} खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा . (३)**

**बालपण म्हणजे सुखाचा काळ आणि बाळपणीतील सुख आणि आनंद काही आगळाच असतो. तिथे भूतकाळाची फिकीर नसते. भविष्याची चिंता करण्याचे काहीच कारण नसते. कसल्याही जबाबदाऱ्या नसतात. उद्याची काळजी नसते. म्हणूनच संत तुकाराम म्हणतात,"लहानपणा देगा देवा मुंगी साखरेचा रेवा".**

**प्रश्न: 1.सुखाचा काळ केव्हा असतो?**

**2. बालपणी कशाची फिकीर नसते?**

**3. संत तुकारामांनी काय म्हटले आहे?**

**प्रश्न २}खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर आठ ते दहा ओळीतनिबंध लिहा. (३)**

**१) मी पोलीस अधिकारी झालो तर...**

२) **माझे आजोबा**

## विभाग ब

**प्रश्न ३} अ} समानार्थी शब्द लिहा. ( कोणतेही दोन) (१)**

**१) हस्त - २) कायम - ३) अखंड- ४) दंत -**

**ब} विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन) (१)**

**१) ऊन x २) खूप x ३) इमान x x४) ओला x**

क} वचन बदला. ( कोणतेही एक ) (१)

१) काडी- २)पान -

ड} लिंग बदला. ( कोणतेही एक ) (१)

१) लेखक - २)गाय -

प्रश्न ४} अ} खालील वाक्य सुचनेनुसार सोडवा. (कोणतेही दोन ) (२)

१)मी परवा तुझ्याकडे येईन. ( सर्वनाम ओळखा )

२) मी आणि विजु उद्या येऊ का?( नाम ओळखा )

३) प्रिया पेपर पहात होती. ( नाम ओळखा )

ब) खालील दिलेल्या वाक्यांचे काळ ओळखून लिहा. (कोणतेही दोन ) (२)

१) भरत अभ्यास करतो.

२) राजू पतंग उडवेल.

३) मी लहान होतो.

## विभाग क

प्रश्न ४} अ} एका वाक्यात उत्तरे लिहा . (कोणतेही ३) (३)

१) बळकट बाहुंनी काय ओढणे शक्य आहे?

२) लेखकाचं प्राथमिक शिक्षण कोठे झाले?

३) सर्व अवयव कोणाविरुद्ध संप करणार आहेत?

४) आपण कोणाची लेकरे असल्याचे सांगतात?

ब) गाळलेल्या जागा भरा. ( कोणतेही ३) (३)

१) कोटि कोटि हे ---------- बाहू |

( बळकट, मोठे, सर्वांचे )

२) म्हणजे मग त्या पोटोबाला चांगलीच ---------- घडेल.

(अक्कल, अद्दल,नक्कल )

3) काठालगत खूप ---------- होते.

(मासे, शिंपले, खडक)

४) नाव वेगळे नाही आम्हा ---------- वेगळा नाही ||

( गाव,घर, किनारा )

**********